जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 SEP 2017

सकाळ



कोल्हापूर : विद्यापीठाच्या एम.बी.ए. विभागातर्फे आयोजित इंडस्ट्रियल इन्स्टिट्यूशन इंटरॅक्शन कार्यक्रमाचे उद्घाटन करताना आनंद माने. शेजारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.

# इंडस्ट्रियल इन्स्टिट्युशन इंटरॅक्शन गरजेचे : आनंद माने

कोल्हापूर, ता. १० : सध्याच्या जागतिकीकरणाच्या वातावरणात उद्योगांना कौशल्यपूर्ण व्यवस्थापनासाठी इंडस्ट्रियल इन्स्टिट्युशन इंटरॅक्शन गरजेचे आहे, असे प्रतिपादन चेंबर ऑफ कॉमर्सचे आनंद माने यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र इमारतीमध्ये एम. बी. ए. अधिविभागातर्फे आयोजित इंडस्ट्रियल इन्स्टिट्युशन इंटरॅक्शन या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. डॉ. शिर्के म्हणाले, 'सातत्याने होणारे औद्योगिक क्षेत्रातील बदल विद्यार्थ्यांनी आत्मसात केल्यास या क्षेत्रात काम करण्याची प्रचंड संधी उपलब्ध होऊ शकते.' प्रथम सत्रामध्ये साऊंड कास्टिंगचे अध्यक्ष व्ही. एन. देशपांडे यांनी, तर द्वितीय सत्रामध्ये मार्केटिंग डायरेक्टर संजीव तुंगतकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या वेळी अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव यांनी क्वॉलिटी मॅनिजमेंटबाबत माहिती विषद केली. एम.बी.ए. विभागाचे संचालक डॉ. एच. एम. ठकार यांनी कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली. डॉ. श्रीमती डी. आर. इंगवले व श्रीमती गं. व्ही. खारगे यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. या वेळी डॉ. एस. एस. महाजन, डॉ. के. व्ही. मारुलकर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 SEP 2017
सकाळ




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागातर्फे आयोजित विशेष व्याख्यानात बोलताना प्रा. डॉ. एस. गुरसामी.

# वंचित समूहांचा अभ्यास करा : प्रा. डॉ. एस. गुरसामी

कोल्हापूर, ता. १० : वंचित समूहांचा सर्वंकष अभ्यास करणे हे समाजशास्त्राच्या अभ्यासकांचे ध्येय असले पाहिजे, असे प्रतिपादन तमिळनाडू येथील गांधीग्राम ग्रामीण विद्यापीठाचे प्रा. डॉ. एस. गुरसामी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागामध्ये यूजीसी सॅप - फेज थ्री अंतर्गत आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते. समाजशास्त्र अधिविभागाचे विभागप्रमुख व सॅपचे समन्वयक प्रा. डॉ. जगन कराडे अध्यक्षस्थानी होते. डॉ. गुरसामी म्हणाले, "भारतीय समाजव्यवस्थेला जाती व्यवस्थेबरोबर वर्ग व्यवस्थेनेसुद्धा ग्रासलेले आहे. स्वातंत्र्यप्राप्तीच्या ७० वर्षांनंतरही कोईमतूर, मीनाक्षीपुरम येथील जाती-भेदभावाच्या घटना त्याची उदाहरणे आहेत. त्यामुळे उच्चवर्गीय व कनिष्ठवर्गीय यांच्यातील दरी दिवसेंदिवस रुंदावत चालली आहे. भारतीय समाजाची मानसिकता हा वंचित समूहांच्या सशक्तीकरणातील सर्वात मोठा अडथळा आहे."

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 1 SEP 2017

तरूण भारत

# वंचित समूहांचा सर्वंकष अभ्यास होणे आवश्यक

**शिवाजी विद्यापीठातील कार्यक्रमात प्रा. डॉ. एस. गुरसामी यांचे मत**

कोल्हापूर : वंचित समूहांचा सर्वंकष अभ्यास करणे, हे समाजशास्त्राच्या अभ्यासकांचे ध्येय असले पाहिजे, असे मत तमीळनाडू येथील गांधी ग्राम ग्रामीण विद्यापीठाचे प्रा. डॉ. एस. गुरसामी यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागात यू. जी. सी. सॅप फेज थ्रीअंतर्गत आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी समाजशास्त्र अधिविभागाचे विभागप्रमुख प्रा. डॉ. जगन कराडे होते.

यावेळी डॉ. गुरसामी म्हणाले की, भारतीय समाज व्यवस्थेला जाती व्यवस्थेबरोबर वर्ग व्यवस्थेनेसुद्धा ग्रासलेले आहे. स्वातंत्र्य प्राप्तीच्या सत्तर वर्षांनंतरही कोईमतूर, मीनाक्षीपुरम येथील जातीय भेदभावाच्या घटना याची उदाहरणे आहेत. त्यामुळे उच्चवर्गीय व कनिष्ठवर्गीय यांच्यातील दरी दिवसेंदिवस रूंदावत चाललेली आहे. आता वंचितांची प्रगती करणे, ही सर्व शिक्षितांची व शासनाची जबाबदारी आहे, असेही मत त्यांनी मांडले.

डॉ. कराडे म्हणाले, भारतातील एकूण वंचित समूहांची स्थिती सर्व राज्यांमध्ये जवळपास सारखीच असल्याचे दिसून येते. म्हणून वंचित समूहांच्या सर्वांगीण विकासासाठी शासकीय धोरणांची अंमलबजावणी काटेकोरपणे व्हायला हवी. सॅपच्या उपसमन्यवक डॉ. प्रतिमा पवार यांनी स्वागत तर डॉ. प्रतिभा देसाई यांनी आभार मानले. कार्यक्रमाला प्रा. डॉ. आर. बी. पाटील, संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.